## प्रेसनोट दि. २२.०६.२०२०

श्री. सुनिल दादासो चव्हाण वय ४७ वर्ष मंडळ अधिकारी वाळवा. ता. वाळवा जि. सांगली व श्री.अमर प्रकाश वाघमारे वय ३३ वर्ष खाजगी इसम यांना ३०,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांची आजी सन २०१८ मध्ये मयत झाली असून तक्रारदार यांचे आजीच्या मृत्युपत्रकाची नोंद तक्रारदार यांचे शेत जमीनीच्या व घरजागेच्या सात बारा उताऱ्यावर करून देणे कामी मंडळ अधिकारी श्री. चव्हाण यांनी तक्रारदार यांचेकडे ७०,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी दि.२१.०६.२०२० रोजी तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दिनांक २२.०६.२०२० रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये श्री. चव्हाण, मंडळ अधिकारी यांनी तक्रारदार यांच्याकडे प्रथम ७०,०००/- रूपये लाचेची मागणी करून चर्चे अंती ६०,०००/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कमे पैकी ३०,०००/- रूपये लागलीच घेवून येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच गोटखिंडी ता. वाळवा जि. सांगली येथे सापळा लावला असता श्री. सुनिल दादासो चव्हाण वय ४७ वर्ष मंडळ अधिकारी वाळवा, ता. वाळवा जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून लाचेची रक्कम श्री.अमर प्रकाश वाघमारे वय ३३ वर्ष खाजगी इसम यांना घेण्यास सांगून तक्रारदार यांचेकडून ३०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना नमूद दोघांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने श्री. सुनिल दादासो चव्हाण वय ४७ वर्ष मंडळ अधिकारी वाळवा, ता. वाळवा जि. सांगली व श्री.अमर प्रकाश वाघमारे वय ३३ वर्ष खाजगी इसम यांचे विरुध्द आष्टा पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्रीमती सुषमा चव्हाण सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक व श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक तसेच पोलीस कर्मचारी अविनाश सागर, रविंद्र धुमाळ, संजय कलकुटगी, संजय संकपाळ, भास्कर भोरे, सारीका साळुंखे पाटील, प्रितम चौगुले, धनंजय खाडे, सिमा माने, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in